**" महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) मार्फत राज्यातील नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, भटक्या जाती - विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना यु.पी.एस.सी. नागरी सेवा व्यक्तिमत्व चाचणी परीक्षा 2022 साठी**

**आर्थिक सहाय्य योजना "**

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील जे उमेदवार केंद्रीय लोकसेवा आयोग - मुख्य परीक्षा 2022 उत्तीर्ण झालेल्या व नागरी सेवा व्यक्तिमत्व चाचणी साठी पात्र ठरले आहेत अश्या उमेदवारांना एकरकमी आर्थिक सहाय्य प्रदान करण्यासाठी आर्थिक सहाय्य योजनेकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**योजनेचे स्वरुप** : केंद्रीय लोकसेवा आयोग - मुख्य परीक्षा 2022 उत्तीर्ण झालेल्या व नागरी सेवा व्यक्तिमत्व चाचणी साठी पात्र नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, भटक्या जाती - विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना एकरकमी रक्कम रु.25000/- आर्थिक सहाय्य महाज्योती मार्फत देण्यात येईल.

**योजनेच्या लाभासाठी पात्रता:**

1. उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी असावा/असावी. तसेच नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, भटक्या जाती - विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील पैकी असावा/असावी.
2. केंद्रीय लोकसेवा आयोग - नागरी सेवा व्यक्तिमत्व चाचणी 2022 साठी पात्र असावा/असावी.
3. ज्या उमेदवारांना सदर परीक्षेसाठी इतर संस्था / सारथी, पुणे कडून अर्थसहाय्य मिळत आहे किंवा त्यासाठी अर्ज केला आहे अश्या उमेदवारांना सदर योजनाच्या लाभासाठी अर्ज करता येणार नाही.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे:**

1. आधार कार्ड
2. रहिवासी दाखला
3. जातीचा प्रमाणपत्र
4. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र
5. मुख्य परीक्षेचे प्रवेश पत्र
6. बॅंकेचे तपशील (बॅंक पासबुक किंवा रद्द चेक)

**क. अर्ज कसा करावा.**

1. महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **"Application Invited For Financial Assistance to Those Who Have Qualified For Interview Personality Test-2022" (Civil Services)** यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्ज करण्याचा अंतिम दि.30/12/2022 आहे.
3. अर्जासोबत ओळखपत्र, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेअर दाखला, रहिवासी दाखला, मुख्य परीक्षेचे प्रवेश पत्र, बॅंकेचे तपशील (बॅंक पासबुक किंवा रद्द चेक) आदि कागदपत्रे जोडणे बंधनकारक राहील. सदर कागदपत्रे स्व-सांक्षाकिंत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावी.
4. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.

5. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा :

**0712-2870120/21, 8956775376/77/78/79/80.**

**E-mail Id :** mahajyotimpsc21@gmail.com

व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर